ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १९ | पुणें, बुधवार तारीख १४ जानेवारी, १९५३ | अंक २

## विविध माहिती

**किमान वेतनाचा कायदा**—मद्रास सरकार राज्यांतील शेतीवर काम करणाऱ्यांना किमान वेतन देण्यासंबंधी कायदा करणार आहे असें समजतें. कायद्याचा मसुदा प्रसिद्ध करण्यांत आला असून लोकांच्या हरकती, सूचना, वगैरे लक्षांत घेऊन १ मार्च, १९५२ रोजीं त्याचा विचार करण्यांत येईल.

**रिक्षा चालविणारी स्त्री**—हैदराबादमधील पोलिसांना २० वर्षें वयाची एक स्त्री रिक्षेवाल्याचा व्यवसाय करतांना आढळून आली आहे. ही स्त्री पुरुषाचा वेष घेऊन बेमालून रीतीनें धंदा करीत होती. दारिद्र्यामुळें आपणास हा धंदा करावा लागतो असा जबाब तिनें दिला आहे. रिक्षा चालविण्यास स्त्रियांना बंदी करणारा कायदा नाहीं.

**अ. भा. कॉंग्रेस कमिटीसाठी इमारत**—कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटीनें अ. भा. कॉंग्रेस कमिटीसाठी दिल्ली येथें एक जागा विकत घेण्याचें ठरविले आहे. अलाहाबादमधील आनंद भवनांतून कमिटीची कचेरी हलविण्यांत आल्यानंतर गेलीं तीन वर्षें कचेरी भाड्याच्या इमारतींत ठेवण्यांत आली होती.

**बडोदा विद्यापीठाला मदत**—पं. नेहरू नुकतेच बडोद्याला गेले असतांना त्यांनीं बडोदा विद्यापीठाच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केलें होतें. भारतीय सरकारनें विद्यापीठाला आतां ५० लाख रुपयांची मदत मंजूर केली आहे असें समजतें.

**हिंदी शास्त्रीय कॉंग्रेसला देणगी**—इंडिअन सायन्स कॉंग्रेस असोसिएशनला इमारत बांधण्यासाठी म्हणून १॥ विघा जमिनीची देणगी कलकत्ता कॉर्पोरेशनकडून मिळाली आहे. कलकत्त्याच्या मेयरकडून कॉंग्रेसच्या अध्यक्षांना देणगीचें वृत्त अद्याप अधिकृत रीत्या कळविण्यांत यावयाचें आहे.

**चार्लि चॅपलिन जिनीव्हांत रहाणार**—सुप्रसिद्ध विनोदी नट चार्ली चॅपलिन स्विटझरलंडमधील जिनीव्हा ह्या शहरांत कायमची वस्ती करून रहाणार आहे असें समजतें. जिनीव्हा सरोवराचें दृश्य दिसूं शकेल अशी एक १६ खोल्यांची इमारत ते विकत घेणार आहेत. घराची किंमत सुमारें ४०,००० पौंड होईल.

**क्षयरोगविषयक परिषद्**—ता. २ फेब्रुवारीपासून ४ दिवस-पर्यंत म्हैसूर येथें अ. भा. क्षयरोग परिषद् भरणार आहे. परिषदेचें उद्घाटन भारताच्या आरोग्यमंत्री राजकुमारी अमृतकुंवर करणार आहेत. बी. सी. जी. औषध टोंचण्याची योजना आणि क्षयरोगावरील नव्या औषधांचा वापर, ह्या विषयांवर परिषदेंत चर्चा होणार आहे.

**युरोपमधील शतायुषी माणसें**—युरोपमध्यें १०० वर्षें वयाचीं १२,००० माणसें आहेत असा अंदाज करण्यांत आला आहे. त्यांपैकी ४,००० युगोस्लाव्हिआंत असून इतर देशांत पुढीलप्रमाणें आहेत. बल्गेरिआ ३,८८९, रुमेनिआ १,७०५, स्पेन ४२०, फ्रान्स २८०, इटली २०० आणि ब्रिटन १००.

**रशिआंतील नवीं पोस्टाचीं तिकिटें**—यू. एस. एस. आर. ह्या सोव्हिएट संघराज्याच्या स्थापनेचा ३० वा वार्षिक दिन साजरा करण्यासाठी रशिआनें पोस्टाचीं नवीं तिकिटें काढलीं आहेत. रशिआंतील १६ घटक राज्यांच्या निशाणांच्या पार्श्वभूमिवर रशिअन संघराज्याचें निशाण तिकिटांवर चित्रित करण्यांत आले आहे.

**कॅन्सर हा अनुवंशिक नाहीं**—अमेरिकेच्या नॅशनल रिसर्च असोसिएशन ह्या संस्थेनें असें मत प्रकट केलें आहे कीं, कॅन्सर हा रोग अनुवंशिक आहे, ह्या समजुतीस पाठिंबा देणारा पुरावा नाहीं. ह्या संस्थेच्या सभासदांत अमेरिकेंतील कॅन्सरच्या रोगासंबंधीचे तज्ज्ञहि आहेत.

**महात्माजींच्या जीवनासंबंधीं चित्रपट**—महात्माजींच्या जीवनांतील ३४ वर्षांचा कालावधि दाखविणारा एक चित्रपट हॉलीवुडमध्यें तयार करण्यांत आला आहे. तो तयार करण्यासाठीं १,००,००० फूट लांबीच्या वार्तापटांतून निवड करण्यांत आली. चित्रपटाचें नांव 'महात्मा गांधी' असें असून क्विंटिन रेनॉल्डस ह्यांना हकिकत सांगण्याचें काम देण्यांत आलें आहे.

**भारतासाठी अमेरिकन यंत्रज्ञ**—दामोदर खोरें योजनेसाठी जी यंत्रसामुग्री विकत घेण्यांत आली आहे ती चालविण्यासाठी अमेरिकन यंत्रज्ञांची भरती अमेरिकेंत करण्यांत येत आहे. ह्या योजनेसाठी जागतिक बँकेकडून कर्ज मिळविण्याविषयीं वाटाघाटी चालू आहेत. परंतु, मदतीच्या अटी ठरण्यास अद्याप कांहीं दिवस लागतील.

**१०६ वर्षांचा योगी**—आसाममधील परमहंस शंकर पुरी ह्या नांवाचे योगी आपल्या वयाच्या १०६ वर्षीं निजधामास गेले. वयाच्या ८० व्या वर्षीं त्यांची दृष्टि गेली होती, ती १०० व्या वर्षीं पुन्हां परत आली. वयाच्या ८२ व्या वर्षीं त्यांचे सर्व दांत पडले होते, पण १०० व्या वर्षीं पुन्हां नवीन दांत येण्यास प्रारंभ झाला होता. मृत्युसमयीं त्यांना २३ नवे दात आले होते.

**मुलांचीं वृत्तपत्रें**—अमेरिकेमधील दुय्यम शाळांतील विद्यार्थी १८,००० वृत्तपत्रें स्वतःच चालवीत असतात. त्यांपैकी तीन दैनिकें असून तीं शिकॅगो, इंडिॲनापोलिस आणि होनोलुलू येथें निघतात. न्यूयॉर्कमध्यें प्रसिद्ध होणाऱ्या एका वृत्तपत्राच्या २८,००० प्रती खपतात.

## आर्थिक व्यवसायांस समाजहिताची बैठक

डे. ए. सोसायटीच्या बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्सच्या नव्या इमारतीचा व जे. एन. टाटा असेंब्ली हॉलचा उद्घाटन-समारंभ रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, सर बी. रामराव ह्यांच्या हस्तें झाला. त्यावेळीं बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. च्या २ लक्ष रुपयांच्या देणगीमुळेंच ह्या व्यापारी कॉलेजाची इमारतीची गरज भागणें शक्य झालें, ह्याबद्दल सिंडिकेटच्या चालकांचा सोसायटीच्या वतीनें गौरव करण्यांत आला. त्याचप्रमाणें टाटांच्या व किर्लोस्करांच्या देणगीबद्दलहि कृतज्ञता व्यक्त करण्यांत आली. सर बी. रामराव ह्यांनीं आपल्या भाषणांत, देशाच्या आर्थिक विकासासाठीं व्यापार व उद्योग-तज्ज्ञ अशा कर्तव्यदक्ष "ब्यूरॉक्रसी" ची आवश्यकता आहे आणि ह्या कॉलेजांतून बाहेर पडणारे विद्यार्थी ती गरज भागवतील अशी आशा व्यक्त केली. ह्यापुढील काळांत, मालक आणि मजूर ह्यांचेमधील तेढ नष्ट होऊन सर्वांना उत्साह वाटेल असें वातावरण निर्माण झाल्याविना प्रगति होणार नाहीं, असें त्यांनीं सांगितलें. त्या दृष्टीनें मालकवर्गाचा कामगारविषयक दृष्टिकोन बदलला पाहिजे. भारताच्या अभ्युदयासाठींच नव्हे, तर प्रथम साध्या संरक्षणासाठीं औद्योगिक विकासाची आवश्यकता आहे; शेतीवर आधारलेली अर्थव्यवस्था लष्करी बचावास उपयोगी पडणार नाहीं असें त्यांनीं स्पष्ट सांगून पंचवार्षिक योजनेनें प्रारंभ होत असलेल्या आर्थिक प्रगतीच्या प्रयत्नांस सर्वांनीं मनापासून हातभार लावावा असें प्रतिपादन केलें.

नव्या पद्धतीच्या आर्थिक संघटनेंत कोणत्याहि प्रांताची वा जमातीची मक्तेदारी टिकूं शकणार नाहीं; हुशार व कर्तबगार लोकांना त्यांत भरपूर वाव आहे हें त्यांनीं मद्रासमधील उदाहरणांनीं सिद्ध केलें आणि त्या दृष्टीनें बृहन्महाराष्ट्र कॉलेजाच्या विद्यार्थ्यांपुढें उज्ज्वल भवितव्य असल्याची ग्वाही दिली. डे. ए. सोसायटीच्या परंपरेंत शिक्षण घेतलेले विद्यार्थी सार्वजनिक जीवनांतील व व्यापारांतील दुष्ट प्रथा नष्ट करून सचोटीचे व कार्यक्षमतेचे आदर्श निर्माण करतील असा विश्वास सर बी. रामराव ह्यांनीं व्यक्त केला. बृहन्महाराष्ट्र कॉलेजाच्या वाढीस सत्प्रवृत्त कारखानदारांनीं व व्यापारी कंपन्यांनीं मदत केल्यानें येथील आर्थिक प्रगतस इष्ट वळण लागण्यास मदत होणार आहे. ह्या दृष्टीनें, त्या कॉलेजाच्या वाढीकडे त्या सर्वांचें सतत सक्रिय लक्ष राहील, तर फारच मोठी कामगिरी होईल. केवळ सट्टेबाजी व स्वार्थी वृत्ति ह्यांस ह्यापुढें वाव रहाणार नाहीं; उद्योगपतींनीं व्यापक सामाजिक हिताकडे लक्ष पुरविलें नाहीं तर कम्युनिझमला त्यांना तोंड द्यावें लागेल. भारतानें लोकशाही पद्धतीनें आर्थिक विकास घडवून आणण्याचें ठरविलें आहे त्याबाबत पैसेवाल्यांचें कर्तव्य स्पष्ट आहे, हा रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांचा इशारा मुख्यतः बड्या व्यापाऱ्यांना व कारखानदारांना लागू असला, तरी इतरांनाहि तो मननीय आहे ह्यांत संशय नाहीं.

त्यांनीं विद्यार्थीवर्गास केलेला उपदेशहि समयोचित असाच होता. कॉलेजाचे मुख्याध्यापक, प्रिं. टी. एम्. जोशी, ह्यांनीं आपल्या प्राथमिक भाषणांत कॉलेजच्या चालकांस व्यापक हितसंवर्धनाच्या जबाबदारीची जाणीव असल्याचें सांगितलें होतें आणि त्यादृष्टीनें करावयाच्या प्रयत्नांचें दिग्दर्शनहि केलें होतें. सर बी. रामराव ह्यांच्या सूचना अंमलांत येण्यासाठी कॉलेजच्या चालकांची तत्परता हवी, ती प्रिं. जोशी ह्यांनीं आधींच दाखविलेली आहे आणि त्यांच्या विद्यार्थ्यांस समाजसेवेचें शिक्षण देण्यास त्यांनीं प्रारंभहि केव्हांच केलेला आहे, ही अत्यंत उत्साहवर्धक गोष्ट आहे. व्यापारी व्यवसायांस समाजसेवेची बैठक देणाऱ्या बृहन्महाराष्ट्र कॉलेजाचा आम्हीं उत्कर्ष चिंतितों.

## खातेदार नसणाऱ्याचा चेक पास कसा झाला ?

शनिवार, ता. २७ डिसेंबर, १९५२ रोजीं महाराष्ट्र बँकेतून ज्याचें त्या बँकेंत खातेंच नाहीं, अशा इसमानें ३,००० रु चा चेक वटविल्याचें वृत्त प्रसिद्ध झालें आहे. बँकेनें ह्या गुन्ह्याची वर्दी पोलिसाकडे दिल्याचें समजतें. खोटा चेक वटविण्याचे प्रकार पुष्कळ होतात, पण बिगर-खातेदाराचा चेक कसा वटविला गेला, अशी शंका सहाजीकच निर्माण होते. म्हणून, कळलेली हकीकत देण्यांत येत आहे.

प्रस्तुत प्रकरणांतील बेअरर चेक बँकेंत कौंटरवर मिळाल्याबद्दलचें टोकन दिलें गेलेलें होतें. चेकवर लेजर फोलिओचा नंबर व त्याखालीं लेजर क्लार्कची छोटी सही आहे, म्हणजे लेजरकीपरनें खातें तपासलें असल्याची ती निशाणी आहे. इतर सर्व चेक्सप्रमाणें चेकवर "पे कॅश" असा शिक्का उठविलेला असून त्याखालीं पासिंग ऑफिसरची सही आहे. ड्रॉवरची सही नेहमींप्रमाणें रद्द करून त्याखाली स्पेसिमेन सही पाहिल्याची सही आहे. ह्या सर्वांवर कळस म्हणजे, पेमेंट स्क्रोलमध्यें चेकची एन्ट्री करण्यांत आलेली असून त्या पुस्तकांतूनच कॅशरकडे चेक नेहमींप्रमाणें गेलेला आहे. सहाजीकच, चेकच्या खरे-खोटेपणाबद्दल कॅशरला शंका येण्याचें कारणच नव्हतें. आणि टोकन घेऊन त्यानें पैसे दिले.

शेवटीं सबसिडिअरी लिहिण्याच्या वेळीं चेकवरील सही लागेना म्हणून चौकशीस प्रारंभ झाला, तेव्हां खातेदार नसणारानें सर्वच गोष्टी बनावट केल्या आणि बँकेचा एक कोरा चेक पैदा करून त्यावर सर्व शिक्के व सह्या स्वतः करून तो चेक जणू काय खरोखरीच सर्वांनीं तपासला असल्याचा बनाव घडवून आणला असें आढळलें. ज्याला सर्वसाधारण बँकिंगचीच नव्हे, तर महाराष्ट्र बँकेंतील कार्यपद्धतीचीहि सूक्ष्म माहिती आहे, आणि तेथें बँकेचें काम चालू असतांना वावरण्याची मोकळीक आहे, अशालाच एवढा बनाव घडवून आणतां येणें शक्य आहे असें म्हणतात. बनावट चेकचे पैसे दिले गेल्यावर चेक भामट्यास बँकेंतून लांबवता आला नाहीं. त्यामुळें ह्या प्रकरणावर हा प्रकाश तरी पडूं शकला आणि चौकशीला साधन शिल्लक राहिलें.

## पूना बँकिंग असोसिएशनशीं रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांची चर्चा

बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्समध्यें पूना बँकिंग असोसिएशननें आपलें बँकिंग प्रदर्शन मांडलें आहे. त्यास रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, सर बी. रामराव ह्यांनीं ता. ११ रोजीं भेट दिली व असोसिएशनच्या सभासदांशीं प्रश्नोत्तर रूपानें तेथें चर्चा केली. श्री. गो. वि. सराफ, डायरेक्टर, बेळगांव बँक लि., ह्यांनीं सर बी. रामराव ह्यांचे समयोचित आभार मानतांना, रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांनीं ठिकठिकाणच्या बँकांच्या प्रतिनिधींशीं व चालकांशीं अशीच अनौपचारिक चर्चा वेळोवेळ करावी, असें सुचविलें.

**व्याख्यान**—दि. १४-१-५३, बुधवार, मकर संक्रांत या दिवशीं सायंकाळीं ५ वा डेप्युटी रजिस्ट्रार श्री. कारखानीस यांचें जनता सहकारी बँक लि. मध्यें ताराचंद मार्केट, ८६६ सदाशिव पेठ, पुणें २ येथें सहकार्य आणि आर्थिक विकास ह्या विषयावर व्याख्यान होणार आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १४ जानेवारी, १९५३





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अपेलेट ट्रायब्यूनलचा निवाडा रद्द ठरविला !

### सार्वजनिक हितासाठी १५ व्या कलमाचा आधार

टाटा ऑइल मिल्स कं. लि., टाटापुरम् आणि कंपनीची स्टाफ असोसिएशन ह्यांचेमध्यें, कंपनीनें नोकरवर्गीत कपात सुचविली त्यावरून भांडण निर्माण झालें. कंपनीच्या मतें, जरूरीपेक्षा नोकरांची संख्या ज्यास्त होती, ती कमी करणें आवश्यक होतें. एर्णाकुलमच्या इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनलनें निवाडा केला, कीं कंपनीनें सुचविलेली कपात आवश्यक नव्हती. अपेलेट ट्रायब्यूनलकडे कंपनीनें अपील केलें, त्यानें इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनलचा निवाडा फिरविला. कारखान्याच्या हिताच्या दृष्टीनें नोकर-कपात करणें आवश्यक झालें होतें, हें कंपनीचें म्हणणें अपेलेट ट्रायब्यूनला पटलें. अपेलेट ट्रायब्यूनलचा निवाडा नामंजूर करण्यांत यावा, असा अर्ज स्टाफ असोसिएशननें सरकारकडे केला, तेव्हां इंडस्ट्रिअल डिस्प्यूटस ( अपेलेट ट्रायब्यूनल ) ॲक्ट १९५० च्या १५ व्या कलमाखालीं त्रावणकोर-कोचीन सरकारनें हुकूम काढून अपेलेट ट्रायब्यूनलचा निवाडा रद्द ठरविला. " नियोजित कपात आवश्यक होती, ती करणें कंपनीच्या अधिकारांतील बाब होती, नोकर-कामगार किती असावेत हें व्यवस्थापकांनींच ठरवावयाचें असतें, सुधारणा आणि काटकसर ह्यांमुळें कमी कराव्या लागणाऱ्या कामगारांची संख्या व्यवस्थापकांनींच ठरवावयाची असते, " हें अपेलेट ट्रायब्यूनलचें म्हणणें सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें मान्य करणें योग्य होणार नाहीं, असें त्रावणकोर-कोचीन सरकारनें ठरविलें. १५ व्या कलमाच्या आधारावर, अपेलेट ट्रायब्यूनलच्या निवाड्याची अंमलबजावणी बंद करण्याचा अधिकार सरकारनें वापरणें, ही अत्यंत गंभीर स्वरूपाची गोष्ट आहे. सरकारला तो अधिकार आहे, ह्याबद्दल संशय नाहीं. कामगार काढून टाकण्यानें सामाजिक न्यायाच्या तत्त्वास बाध येतो, असें सरकारचें मत झालें. कामगार नालायक ठरले नसतील किंवा बेशिस्त नसतील आणि कंपनी नफा मिळवीत असेल, अशा परिस्थितींत कोणत्याहि सबबीवर कामगार काढल्यानें, सर्वच ठिकाणच्या कामगारांच्या मनांत रोजगाराच्या शाश्वतीबद्दल भीति निर्माण होईल आणि तशी ती होणें सार्वजनिक हिताचें नाहीं, असा सरकारचा युक्तिवाद आहे.

एकाद्या कारखान्यानें नवीं यंत्रें बसविलीं, सुधारणा घडवून आणल्या, कामाची पद्धति सुधारली आणि त्यामुळें पूर्वीपेक्षा कमी कामगार लागू लागले, तरी जुन्या कोणत्याहि कामगारास कामावरून काढतां येणार नाहीं, असा त्रावणकोर-कोचीन सरकारच्या हुकुमाचा अर्थ होतो. एकाद्या बँकेनें दैनंदिन व्यवहारासाठीं नवीं यंत्रें खरेदी केलीं आणि त्यामुळें वेळेची बचत होऊन काम चांगलें होऊं लागलें, तरी नोकरवर्गावरील खर्चांत मात्र बँक बचत करूं शकणार नाहीं; नव्या सुधारणेमुळें नोकरांची संख्या कमी होऊं दिली जाणार नाहीं, असा ह्या हुकुमाचा निष्कर्ष आहे. अपेलेट ट्रायब्यूनलचे निवाडे कामगारवर्गाच्या बाजूनेंच बहुधा होतात; दुसऱ्या बाजूकडे योग्य तें लक्ष दिलें जात नाहीं अशी मालकवर्गाची तक्रार आहे. असे निवाडे करणाऱ्या ट्रायब्यूनलनेंहि कामगारवर्गाच्या विरुद्ध निवाडा केला आणि त्याचें योग्य समर्थन केलें, तरी राज्य सरकार सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें तो निवाडा धाब्यावर बसविणार आणि कंपन्यांवर भुर्दंड लादून सामाजिक न्यायाच्या अंमलबजावणीचें श्रेय मिळवूं पहाणार. जरूर नसलेला नोकर कमी करणें सामाजिक हिताचें नसेल, तर सरकारी नोकरांनाहि हें संरक्षण सरकार देईल काय ? त्रावणकोर-कोचीन सरकारनें अपेलेट ट्रायब्यूनलचा निवाडा रद्द करून, एक नवीनच प्रथा पाडली आहे, ह्यांत संशय नाहीं.

त्रावणकोर-कोचीनमधील विशिष्ट राजकीय परिस्थिति ज्याला माहीत आहे, त्याला त्या राज्य सरकारच्या ह्या कृतीबद्दल आश्चर्य वाटणार नाहीं. निवाडा रद्द करण्याच्या मागील पार्श्वभूमि लक्षांत घेऊनच सरकारी धोरणाची कल्पना केली पाहिजे.

---

## कॉलेजमधील विद्यार्थ्यांचें आरोग्य

कलकत्ता येथें शिकणाऱ्या कॉलेजांतील विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी कलकत्ता विद्यापीठातर्फें करण्यांत आली असतां निराशाजनक परिस्थिति आढळून आली. ही तपासणी १९५१ व १९५२ सालांत करण्यांत आली होती. तपासणी करण्यांत आलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येपैकीं ५० टक्के विद्यार्थ्यांना कांहीं रोग असल्याचें आढळून आलें किंवा त्यांच्यांत कांहीं दोष तरी दिसून आले. ३० टक्के विद्यार्थ्यांची दृष्टि निर्दोष नसल्याचें आढळून आलें. ५,००० विद्यार्थ्यांपैकीं प्रत्येक तिसरा विद्यार्थी आपल्या वयाच्या मानानें कमी वजनाचा आणि कमी उंचीचा आढळून आला. ह्याचा अर्थ, त्यांचा आहार कमी प्रतीचा होता असा आहे. १९३९ सालीं तपासणी करण्यांत आली असतांना आरोग्याच्या निदर्शक अशा ज्या उंचीच्या अगर वजनाच्या सरासरी होत्या त्या सरासरी कमी झाल्याचें आढळून आलें. १९३९ साल म्हणजे युद्ध सुरू होण्यापूर्वीचा काळ आहे. त्यावेळीं शिधापद्धत नव्हती आणि अन्नाच्या किंमतीही वाढलेल्या नव्हत्या. १६ ते २० वर्षें वयाच्या मुलांच्या गटाची सरासरी उंची अर्ध्या इंचानें कमी झालेली आढळून आली. सरासरी वजनांतही ८ पौंडांची घट झाल्याचें दिसून आलें. छातीच्या घेरांतही एका इंचाची घट झाल्याचें आढळून आलें. ह्या सर्व माहितीचा निष्कर्ष म्हणून विद्यापीठाच्या स्टूडण्टस वेलफेअर कमिटीनें पुढील मतप्रदर्शन केलें आहे. " १९३९ च्या विद्यार्थ्यांच्या मानानें १९५१-१९५२ सालांतील विद्यार्थी वजनानें हलका, उंचीनें खुरटा आणि आरोग्याच्या दृष्टीनें कमी प्रतीचा आहे." राष्ट्रीय आरोग्य, आहार आणि आर्थिक उत्पादन ह्यांचा परस्पर संबंध निकटचा असल्यामुळें अशा निःसत्त्व पिढीचा देशांतील धनोत्पादनावर वाईट परिणाम होणें अपरिहार्यच आहे.

## बँकांच्या अडचणींची चर्चा

### (२)

(श्री. वामनराव वर्दे ह्यांच्या अध्यक्षतेखाली १ डिसेंबर, १९५२ रोजीं बँक-प्रतिनिधींनीं बँकांपुढील ज्या प्रश्नांची चर्चा केली, त्यांपैकीं जे प्रश्न सोडविण्यासाठीं वरिष्ठ अधिकारी-संस्थांकडे दाद मागितली पाहिजे, अशा प्रश्नांचा परामर्ष गेल्या अंकांत घेण्यांत आला होता. जे प्रश्न बँकाच स्वतः सोडवूं शकतील, अशा प्रश्नांचें दिग्दर्शन येथें करण्यांत आलें आहे. श्री. गो. वि. सराफ, बी. ए., एलएल. बी., डायरेक्टर, बेळगांव बँक लि., बेळगांव, ह्यांच्या बहुमोल सहकार्यामुळेंच सर्व चर्चेचा निष्कर्ष हित-संबंधीयांसाठीं एकत्रित देता येत आहे, ह्याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहोंं.)

**(१) कर्जदारांच्या पतीबद्दल माहिती**

विवक्षित विभागांतील बँकांनीं बँक्स असोसिएशनमध्यें सामील व्हावें, डायरेक्टरांचे व व्यवस्थापकांचे क्लब्स असावेत, म्हणजे त्यांत अनौपचारिक रीतीनें माहितीची देवाण-घेवाण होऊं शकेल.

**(२) इंडियन बँक्स असोसिएशनची ॲडमिशन फी**

मध्यम आकाराच्या बँकांना इंडियन बँक्स असोसिएशनची ॲडमिशन फी जड वाटते. अशा बँकांना त्यांत निम्म्या रकमेची सवलत मिळावी, म्हणजे असोसिएशनहि अधिक प्रातिनिधिक होऊं शकेल.

**(३) क्लिअरिंग हाऊसची सोय**

जेथें अनेक बँका आहेत अशा ठिकाणीं क्लिअरिंग हाऊसची सोय घडवून आणावी; त्यामुळें वेळ व खर्च वाचूं शकतो. अशा क्लिअरिंग हाऊसचें सभासदत्व सहकारी आणि बिगर-शेड्यूल्ड बँका ह्यांनाहि मोकळें असावें अशी त्यांच्या प्रतिनिधींनीं मागणी केली.

**(४) बँक नोकरांच्या ट्रेनिंगची व्यवस्था**

बँक नोकरांच्या शिक्षणाची व्यवस्था करणें अगत्याचें आहे. रिझर्व्ह बँक त्यासाठीं एखादी संस्था स्थापण्याचा विचार करीत आहे असें समजतें. त्याची वाट न पाहतां, मोठ्या बँकांनीं लहान बँकांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्यांच्या कचेऱ्यांत अनुभव मिळण्याची सोय करून द्यावी. सामान्य नोकरांना बुककीपिंग आणि अकौंटन्सीची परीक्षा देण्यास व एजंटच्या दर्जाच्या नोकरांना सी. ए. आय. आय. बी. ची परीक्षा देण्यास प्रोत्साहन देण्यांत यावें.

**(५) कमिशन, व्याज, गोडाऊन विमा**

बँकिंगच्या व्यवसायाचा दर्जा चांगला रहावा ह्या दृष्टीनें ठिकठिकाणच्या क्षेत्रांतील बँकांनीं वारंवार, सल्लामसलत करून, कमिशनचे दर, ठेवींवरील आणि कर्जावरील व्याजाचे दर, तारणा-वरील कर्जाचेबाबत राखावयाचीं मार्जिन्स, गोडाऊनच्या विम्या-बाबत एकसूत्रता, इत्यादि बाबतींत निर्णय घ्यावेत. त्यावर-हुकूम झालेल्या सर्वमान्य सूचना बाजूस सारून विघातक स्पर्धेचा अवलंब करूं नये. कांहीं बाबतींत गैरसोय झाल्यास, त्यांत बदल करून सर्वांस वेळींच कळवावा.

**(६) बँकांचें काम अधिक तत्परतेनें झालें पाहिजे.**

बँकांचीं कामें तत्परतेनें, सुरक्षितपणें आणि कार्यक्षमतेनें कर-ण्यांत आलीं, तरच त्यांच्याकडे ठेवीदार आकृष्ट होऊन बँकिंगचा प्रसार होईल. कांहीं परदेशी बँकांत, कौंटरवर चेक दाखल करतांच त्याची रक्कम दिली जाते. खातेदार बँकेच्या माहितीचा व विश्वासाचा असतो म्हणून हें शक्य होतें, हें तर खरेंच; परंतु आपल्याकडील पद्धतीमुळें चांगल्या माहितीच्या खातेदाराचाहि खोळंबा होतो. बँकेमार्फत लोकांनीं त्यांच्या बिलांची देणीं द्यावीं आणि पगार, दुकानांचीं बिलें, इत्यादींची वसुली करावी, अशी संवय वृद्धिंगत झाली पाहिजे. बँकेची सेवा सर्वांगीण, तत्परतेची आणि कार्यक्षम होणें जरूर आहे.

**(७) छपाई व स्टेशनरी पुरवठा ह्यांची एकत्रित सोय**

सध्या प्रत्येक बँक आपआपली व्यवस्था स्वतंत्रपणें करते. त्याऐवजीं, खालील गरजांसाठीं संयुक्त व्यवस्था करणें शक्य होईल.

(अ) कायद्याचा सल्ला, (ब) विमा, (क) नेहमीचे फॉर्म्स, चेक्स, छपाई, स्टेशनरी, ह्यांचे बाबतींत एकसारखेपणा, (ड) एकत्रित जाहिरात. ह्यामुळें ओव्हरहेड खर्चांत सुमारें २०% बचत होऊं शकेल.

**(८) बँकिंगचे खास व्यवसाय**

औद्योगिक कर्जपुरवठा, शेतीस कर्जपुरवठा, इत्यादि कामेंहि बँकांनीं करावींत असें सुचविण्यांत आलें. पण आपल्या देशांतील अनुभव ह्या दोन्ही बाबतींत असमाधानकारक आहे आणि व्यापारी बँकांनीं असा जोखमीचा व्यवहार हातीं घेऊं नये, तें त्यांचें काम नाहीं, असें अध्यक्षांनीं स्पष्ट सांगितलें. त्यासाठीं स्वतंत्र सरकारी संस्थाच आवश्यक आहेत.

**(९) आंतर-बँक व्यावसायिक सोई**

व्यवहाराचा दर्जा उच्च पातळीवर ठेवणाऱ्या बँकांनीं एकमे-कांच्या वेगवेगळ्या कचेऱ्यांवर, तशी व्यवस्था करून, रकमा मिळण्यासाठीं चेक काढण्यास प्रारंभ करावा. बँकां-बँकांतील कर्जे व ठेवी ह्यांच्या व्याजाचे खास दर असावेत. चांगल्या पतीच्या कर्जदाराला बँकांनीं एकत्र येऊन मोठें कर्ज द्यावें; जरूरीप्रमाणें त्याची आपआपसांत वांटणी करावी.

गिऱ्हाइकांची पतविषयक माहिती विश्वासानें द्यावी-घ्यावी, म्हणजे एकच कर्जदार अनेक बँकांतून भरमसाट कर्ज मिळवूं शकणार नाहीं. बँकिंगच्या व्यवसायाचा दर्जा वाढविण्याच्या दृष्टीनें सर्वांचा प्रयत्न असावा.

**(१०) बाजारांतील उलाढालींची माहिती**

कॅनरा बँकेच्या प्रतिनिधींनीं त्यांच्या पब्लिसिटी खात्याची, त्यांच्या मासिकाची आणि बाजाराची माहिती प्रमुख खातेदा-रांना ज्यांत देण्यांत येते त्या सर्क्युलरांची माहिती सांगितली.

बहुतेक सर्व सूचनांस माननीय अध्यक्षांनीं त्यांच्या समारोपाच्या भाषणांत पाठिंबा दिला आणि अशा प्रकारच्या समारंभांमुळें व चर्चेमुळें बँकिंगच्या क्षेत्रांतील मंडळींत एकोप्याची व सहकार्याची भावना वृद्धिंगत होत जाईल, असा विश्वास व्यक्त केला.


—: महाराष्ट्राची अग्रेसर कंपनी :—

**दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कंपनी लि.**

पहिल्याच मूल्यमापनांत बोनस जाहीर करून, कंपनीनें असाधारण विक्रम करून दाखविला आहे. दुसऱ्या मूल्यमापनाचें काम चालू झालें असून, त्यांत निश्चित प्रगति दिसेल अशी खात्री वाटते.

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

### पाकिस्तानमधील चहाचा धंदा

बँकांच्या सहाय्याच्या अभावीं भारतांतील चहाचा धंदा जसा अडचणींत सांपडला आहे त्याचप्रमाणें पाकिस्तानचाही सांपडला आहे. पुढील हंगामापासून पूर्व-बंगालमधील ३२ चहाचे मळे बंद ठेवण्याचा निर्णय त्यांच्या मालकांनीं घेतला आहे. ह्या धंद्यावर एकंदरींत जी मंदीची लाट पसरली आहे तिचा परिणाम पाकिस्तानमधील चहाच्या मळ्यांवरहि होणें अपरिहार्यच आहे. मंदीचा परिणाम आतां किरकोळ विक्रीवरही होऊं लागला आहे. डाक्क्यांत चहाच्या दर पौंडामागे ४ ते ६ आणे तोटा सोसून तो विकण्यांत येत आहे. पूर्व-बंगालमध्यें १३३ चहाचे मळे आहेत आणि त्या सर्वांचें मिळून क्षेत्र सुमारें ८२,००० एकर इतकें आहे. सर्व मळ्यांतील एकूण उत्पादन ५ कोटी पौंडापर्यंत होतें. उत्पादनापैकीं अंदाजे १·७ कोटी ते २·२ कोटी पौंड चहा १९५१ सालीं पाकिस्तानांतच खपला. अर्थात् ह्या संबंधींचे अंदाज वेगवेगळे आहेत. एकूण मळ्यांपैकी ६४ मळे युरोपिअन भांडवलदारांच्या मालकीचे आहेत, ४० पाकिस्तानी नागरिकांच्या मालकीचे आहेत आणि २९ भारतीय नागरिकांचे आहेत. बहुतेक सर्व, म्हणजे १०९ चहाचे मळे, सिल्हेट जिल्ह्यांत आहेत. पाकिस्तान सरकारचें अग्रिकल्चरल फिनॅन्स डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन चहाच्या धंद्याला कशा तऱ्हेनें मदत करावी ह्यासंबंधीं सध्या विचार करीत आहे. चहाच्या मळेवाल्यांच्या मागण्या त्या कॉर्पोरेशनकडे लवकरच सादर करण्यांत येणार आहेत. त्या मागण्यांत मुख्य मागण्या पुढीलप्रमाणें आहेतः धंद्याला द्रव्यविषयक मदत ताबडतोब देण्यांत यावी, बाजारपेठांसाठी सवलती देण्यांत याव्यात आणि जरूर ती यंत्रसामुग्री पुरविण्यांत यावी. भारतामधील चहाच्या मळ्यांनाहि आर्थिक साह्याची निकडीची गरज आहेच.

---

### भारत सरकारचें आयात धोरण
### (जानेवारी-जून १९५२)

सदरहू धोरण गेल्या वर्षाच्या याच मुदतीच्या धोरणासारखेंच असून त्यांत परकीय हुंडणावळीची परिस्थिति आणि देशी मालाच्या उत्पन्नांतील सुधारणा लक्षांत घेण्यांत आल्या आहेत. जुलै-डिसेंबर १९५२ च्या पातळीवर फार मोठ्या क्षेत्रांत आयात टिकविण्याचा विचार आहे. ७० टक्के वस्तूंबाबतचें धोरण बदललें नाहीं.

मागील परवाना मुदतींत देशांत, बऱ्याच प्रमाणांत असलेला सांठा आणि परकीय हुंडणावळीबाबत अनिश्चितता लक्षांत घेऊन अनेक वस्तूंच्या आयातीचें प्रमाण कमी करावें लागलें होतें. अशी केलेली कपात अंशतः आणि इतर कांहीं वस्तूंबाबत पूर्ण प्रमाणांत भरून काढतां येईल असें आतां आढळून आलें आहे. एक वर्षाहून अधिक काळ कोटा न दिलेल्या कांहीं विशिष्ट वस्तूंसाठी कोटा-परवाने देण्याचा सरकारनें निर्णय घेतला आहे. यांत बिस्किटें व खाऊ, सुवासिक स्पिरिट, पचे, धातूचीं बटनें, धूम्रपानास लागणाऱ्या वस्तू, व्हल्कनाईज्ड फायबर सूटकेसेस, यांचा अंतर्भाव होतो. देशांतील कांहीं वस्तूंच्या उत्पादनांत सुधारणा झाल्यामुळें सरकारला त्यांच्या आयातीचें प्रमाण कमी करतां आलें: असून त्यांच्या खात्यावरील परकीय हुंडणावळींत बचत करणें शक्य झालें आहे.

---

**भुइमुगाचें उत्पादन**—मद्रास राज्यांत, भारतांत उत्पादन होणाऱ्या भुइमुगापैकी ५० टक्के भुइमुगाचें उत्पादन होतें. मद्रास, मुंबई व हैद्राबाद ह्यांत मिळून भारतामधील ८० टक्के भुइमुगाचें उत्पादन होतें.


## दि बॉम्बे स्टेट
## को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.
**स्थापना १९११**

टेलिफोन नं. २५४६१, ३१,६८६ | पोस्ट बॉक्स नं. ४७२, तारेचा पत्ता : फार्मरबँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगांसाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | |
|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ३३,२५,४०० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. १६,००,००० |
| | रु. ४९,२५,४०० |
| गंगाजळी व फंड | रु. ४३,२८,९०० |
| ठेवी | रु. ८,५४,८१,४०० |
| खेळतें भांडवल | रु. १०,८५,०२,२०० |

**१५ जिल्ह्यांत ६३ शाखा**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.





पुणें डेक्कन जिमखाना शाखेंतील सेफ डिपॉझिट व्हॉल्टसचा अवश्य फायदा घ्यावा.

## ' मी पाहिलेला रशिआ '

### एक उद्बोधक व्याख्यान

इंडिअन कौंसिल ऑफ वर्ल्ड अफेअर्स ह्या संस्थेच्या हैदराबाद शाखेतर्फे सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. ग्यानचंद ह्यांचें एक उद्बोधक भाषण नुकतें झालें. व्याख्यानाचा विषय ' मी पाहिलेला रशिआ ' असा होता. रशिआंतील सामाजिक व आर्थिक पद्धतीबद्दल अगदीं उलटसुलट विचार खुद्द त्या देशांत जाऊन आलेल्या लोकांकडूनहि ऐकावयास मिळतात. ह्या एकाच गोष्टीवरून तद्देशीय अर्थव्यवस्थेविषयीं नक्की कल्पना येणें कसें कठीण आहे तें दिसून येतें. तथापि डॉ. ग्यानचंद ह्यांच्यासारखे मुरब्बी अर्थशास्त्रज्ञ ह्या विवाद्य प्रश्नांविषयीं काय प्रतिपादन करतात तें विचारणीय ठरण्यासारखें खास आहे. १९३२ सालामधील रशिआ आणि आजचा रशिआ ह्यांची तुलना करून डॉ. ग्यानचंद म्हणाले, कीं आजचा रशिआ हा विकसित, सुव्यवस्थित, आत्मविश्वासयुक्त आणि शिस्तीचा भोक्ता दिसून येतो. योजनाबद्ध अर्थव्यवस्थेंत जीवनाला एक प्रकारच्या साच्यांत बंद व्हावें लागतें अशी कल्पना पुष्कळदा पुढें मांडण्यांत येते. पण रशिआंत तसें कांहीं झालेलें दिसत नाहीं. उलट त्या नियोजित अर्थव्यवस्थेमुळें सामाजिक व वैयक्तिक जीवनाला विशिष्ट तऱ्हेचें वळण लागलेलें असून त्याला कांहीं अर्थ दिसून येतो. रशिआंतील व्यक्तिजीवनांत आज संथ कार्यक्षमता, वक्तशीरपणा आणि आत्मविश्वास हे सद्गुण दिसून येतात.

रशिआंत मालाच्या किंमती ठरवितांना कांहीं विशिष्ट धोरण ठेवण्यांत येतें, त्या अशा तऱ्हेनें नियंत्रित करण्यांत येतात, कीं जरूरीच्या वस्तू स्वस्त भावानें मिळतात आणि चैनीच्या वस्तू चढत्या भावानेंच मिळतात. कोणत्याहि मालाची किंमत सर्व रशिआंत सारखीच असते ह्यावरून हा सबंध देश एकसंघ बाजारपेठ झालेला आहे, हें उघडच दिसतें. सामान्यपणें व्यापार हा सार्वजनिक संस्थांमार्फत चालतो हें खरें असलें तरी खाजगी व्यापारालाहि थोडीफार जागा आहे. दुकानांत आलेल्या गिऱ्हाइकांशीं नीट वागणें आणि त्याची गरज कार्यक्षमतेनें पुरविणें ह्या बाबतींत रशिआंतील दुकानें इतर कोणत्याहि देशांतील चांगल्या तऱ्हेनें चालविलेल्या दुकानांशी स्पर्धा करूं शकतील अशीं आहेत. हल्ली रशिआंत शिधापद्धति चालू नाहीं. अन्न भरपूर आणि स्वस्त मिळतें. सार्वजनिक मुद्पाकखान्यांतून जेवण घेणें लोकप्रिय झालेलें नाहीं. व्यक्तींच्या उत्पन्नांत लक्षांत येण्यासारखी तफावत नसते; आणि तशी ती असली तरीसुद्धां सरकारतर्फे पुरविल्या जाणाऱ्या सुखसोयींमुळें ती फारशी जाणवत नाहीं. जास्तींत जास्त उत्पन्न व कमींत कमी उत्पन्न ६:१ असें आहे. शास्त्रज्ञ, कलावंत आणि साहित्यिक ह्यांचें उत्पन्न वरच्या गटांतील असतें. रशिआंतील शास्त्रज्ञांना व प्राध्यापकांना सगळ्यांत अधिक वेतन मिळतें. एखाद्या वर्गाला विशेष सवलती अशा दिल्या जात नाहीत आणि आर्थिक विषमता अपरिवर्तनीय अशा स्वरूपाची नसते. रशिआंत अल्पसंख्य असलेल्या जमातींचीं राष्ट्रें आहेत आणि त्यांची आर्थिक प्रगतीहि चांगली झालेली आहे. तथापि त्या त्या राष्ट्रांचें सांस्कृतिक आणि कलात्मक जीवन आपलें स्वतंत्र अस्तित्व टिकवून आहे.

डॉ. ग्यानचंद ह्यांच्या भाषणांतील वस्तूंच्या किंमतीसंबंधीचा भाग अर्थशास्त्रदृष्ट्या अर्थातच अधिक महत्त्वाचा आहे. समाजवादी अर्थव्यवस्थेंत जीवनाला आवश्यक वस्तूंचे व त्याच्या वरांतील वस्तूंचे दर काय असतात आणि ते सामान्य माणसाला पेलणारे असतात किंवा नाहीं असा प्रश्न नेहमी विचारला जातो. डॉ. ग्यानचंद ह्यांनीं त्यांवर चांगला प्रकाश टाकला आहे.


दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी : भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | १,०८,४०० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | .... | ४७,६६,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील सांगली चेअरमन


श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B. मॅनेजर

किर्लोस्कर

५ हॉ.पॉ. वर चालणारा

आमच्या वसंत नं. ३, शरद वगैरे पॉवर चरकांच्या मालिकेंत नवीन "कोयना" चरकाचे आगमन. कमी पॉवर लागत असल्यानें भांडवलांत बचत झाली आहे.




विशेष माहितीसाठीं लिहा—

किर्लोस्कर बंधु. लि., किर्लोस्करवाडी (दं. सातारा)

# दुष्काळ–निवारणाचीं योग्य साधनें

( अर्थाच्या ३१–१२–५२ च्या पृष्ठ ४४६ वरून चालू )

[ लेखक :—न. स. जोशी ]

## खेडोंपाडीं सरकारी धान्य–कोठारें

दुष्काळ–निवारण हें उद्दिष्ट यशस्वी रीतीनें साधण्यास मुख्यतः खालील *उपायांची अटळ गरज असते.

(१) दुष्काळाकरितां लागणारें धान्य साठविण्यासारखीं व घूस–उंदीर यांपासून संरक्षण–क्षम कोठारें.

(२) शक्यतर† { (अ) खेडेगांवांतील सर्व धान्याची त्याच गांवांतील सरकारी कोठारांत साठवण व ज्याचें त्यांस जरूर तसतसें देण्याची सरकारकडून व्यवस्था.

किमान पक्षीं { (ब) दुष्काळी दिवसांत उपयोगी पडावें म्हणून. धान्य-पट्टी (levy) च्या वा इतर रूपानें धान्य-वसुली (वा खरेदी) व त्याच खेडेगांवांत सरकारकडून सांठा.

व (३) खेड्यांतल्या बिगर–शेती व्यक्तींना त्याच खेड्यांतील जमीनमालकांकडून धान्य विकत घेण्याची शक्ति निर्माण करण्यास योग्य असें व खेड्यांतल्या खेड्यांतच मिळण्याजोगें काम.

पैकीं खेडूत जनतेची क्रयशक्ति वाढविण्याकरितां त्यांना कोणतें काम पुरवावयाचें याचा तपशीलवार विचार एका निराळ्या लेखांत करावा लागेल. मात्र अशा कामाची ( खेड्यांतल्या खेड्यांतच मिळण्याजोगें व तेंसुद्धां साधेंसुधें ) व्यवस्था करणें शक्य आहे, एवढी ग्वाही येथेंच देणें जरूर आहे. त्याबाबत थोडें दिग्दर्शन या लेखांत पुढें केलें आहे.

ज्याला दुष्काळी मुलूख म्हणून संबोधलें जातें तो धान्याच्या दृष्टीनें तुटीचा नव्हे तर वाढाव्याचा प्रदेश असतो, हें प्रस्तुत लेखकानें या व इतर अनेक लेखांत सांगितलें आहे व आंकड्यानिशीं सिद्ध केलें आहे. मुंबई प्रांतातील दुष्काळी मुलखाचा मुकुटमणी जो विजापूर जिल्हा तेथून मोठ्या प्रमाणावर धान्य निर्यात होतें ही स्थिति फार सूचक आहे. त्याचेच बरोबर तेथें दुष्काळांत कित्येकांची अन्नान्न–दशा होते ( व भूकबळींहि पडत असतील ) हें सत्य आहे. पण त्याचें निदान धान्यतूट हें नव्हें व त्यावर उपायहि कॅनाल नव्हे. ह्या विधानाची सत्यता व्यवहारांत पटण्यास खालील दोन उपमांचा उपयोग होईल.

एकाद्यास साधे रेच होऊं लागले तर त्यास सौम्य रेचक हाच योग्य उपाय जाणते डॉक्टर–वैद्य सुचवितात; कारण त्या विकृतीचें मूळ अपचन व बद्धकोष्ठता हें असतें. त्याऐवजीं रेच थांबविण्यास अवरोधक औषध देणें चूक. ह्या उपदेशांत जशी दिसयला असंबद्धता दिसते, तद्वतच दुष्काळ–निवारणास कालवे काढणें किंवा धान्य–वाढ हा उपाय नव्हे, हें सांगितलें तर पुष्कळांना तें पटण्यास कष्ट पडतात.

संसारांत मग्न व दक्ष असलेल्या एकाद्या गृहस्थाची पत्नी, पतीस मिळणाऱ्या ७०–८० रुपयांत ठाकठिकीनें संसार चालवते व मुलांबाळांस चार ताजे घास वेळेवर घालून आनंदांत ठेवते. याउलट हजारों रुपयांची सरासरी मोठी प्राप्ति असलेल्या इसमाचीं मुलें उन्मत्त, स्वतंत्र व बेजबाबदार असून, पत्नीही संसारविन्मुख असली म्हणजे घरांत सगळाच खेळखंडोबा होतो व बोजवारा उडतो, असलीं उदाहरणें आपण अनेकदां पाहतों. मुंबई राज्यांतील कमी धान्योत्पादनाच्या परंतु बिनदुष्काळी भागास गरीब पण प्रेमळ कुटुंबाची उपमा देतां येईल तर सरासरी धान्योत्पादन भरपूर पण पर्जन्य-पातांत फार मोठा चढ-उतार व त्यामुळें धान्योत्पादनाची अनिश्चितता असलेल्या दुष्काळी भागास श्रीमंताच्या बिन–हिशेबी व बेशिस्त घराण्याची उपमा देतां येईल. या दुसऱ्या प्रकारच्या कुटुंबाच्या उत्पन्नांत आणखी भर टाकणें हा कां त्याचा संसार सुरळीत होण्याचा मार्ग? मुळींच नव्हे. त्या घरास "पेडगांवच्या शहाण्यांतील" एकाद्या "काका"ची गरज असते. त्या बोलपटांतील "काका" जसा प्रत्येकाला वठणीवर आणतो तसाच दुष्काळी मुलुखांतील धान्योत्पादनाची वाटणी सम–प्रमाणांत करणाऱ्या कोणातरी "काका"ची अत्यंत गरज आहे. बोलपटांतील "काका" च्या नांवचें बँकबुक आहे व त्यांत तीन लाख रुपये आहेत ही समजूत, तसेंच त्या काकाचें अचूक निदान, निस्पृहपणा व स्पष्टवक्तेपणा यामुळेंच यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणें त्या कुटुंबाची सगळी घडी उत्तम बसली. बँक–बुकांतल्या एका पैचीहि प्रत्यक्ष जरूरी पडली नाहीं !

तद्वतच महाराष्ट्र–कर्नाटकांतील दुष्काळी मुलुखाची स्थिति असते. तेथील जनतेस पुरून उरण्याइतकें धान्य बहुतेक खडेगांवांत आजहि निर्माण होत आहे. थोडे आपमतलबी वा काळाबाजार करणारे सोडले तर इतरांना त्या धान्याचा मोठा सांठा करून ठेवण्याची इच्छा असते, अशांतलाहि भाग नाहीं. त्यापैकीं पुष्कळांना जाणीव असते कीं उंदीर–घुशीच कितीतरी धान्य खातात; तें बिगर–जमीन भुकेलेल्यांच्या तोंडांत पडलें तर त्यांना त्यांत संतोषच होईल. फक्त एकंदर परिस्थितीमुळें त्यांचें मन साशंक व अस्थिर असतें. यावर उपाय करणें ते सरकारनेंच करणें शक्य आहे. उपाय वर सांगितलेच आहेत.

धान्य–कोठारें बांधण्यास सरकारला खर्च करावा लागेल, हें खरें; पण धरणें बांधण्यावर पैसे खर्च करून त्यांचा दुरुपयोग झाला म्हणून पस्तावण्यापेक्षां धान्य–कोठारांवर तो करणें फारच योग्य व व्यवहार्य. कालव्यांच्या मानानें कोठारांस लागणारा खर्च पुष्कळच कमी व उपयोग पुष्कळच जास्त.

कोठार कोणत्या प्रकारचें असावें, याबद्दल चर्चा करण्याचें हें स्थळ नव्हे; व म्हणून मोठाल्या शहरांतून वा तालुक्याच्या व तसल्याच इतर ठिकाणीं आज १०–१५ वर्षें वापरांत असलेल्या प्रकाराचा म्हणजे लाहोर–कोठारांचा येथें उल्लेख केला आहे. लाहोर–कोठारांची उपयुक्तता अनुभवसिद्ध आहे. तसलीं निरनिराळ्या आकाराचीं कोठारें अनेकांनीं बधितलेलीं आहेत; व म्हणून त्या नमुन्याचींच कोठारें नजरेसमोर ठेवलीं आहेत. लहान वा मोठ्या लोकसंख्येच्या मानानें तीं लहान वा मोठीं बांधतां येतील. फारच मोठ्या प्रमाणांवर व सरकारी मालकीच्या वा सरकारानें गोळा केलेल्या धान्याकरतां प्रमुख केन्द्रांत कंक्रीटचीं ( उभीं व पिंपाच्या आकाराचीं ) मोठीं कोठारें जरूर तेथें बांधणेंहि शक्य आहे. पण प्रस्तुत त्यांचा विचार करण्याची जरूरी नाहीं. तसेंच, खेडेगांवांतील परिस्थितीला अधिक सोईस्कर असा कोठाराचा आकल्प करणें अर्थात शक्य आहे. गांवाच्या सर्व शिवारांतील कोणत्याही शेतांतील धान्य कोठारांत विनासायास आणतां यावें म्हणून कांहीं कच्चे रस्ते करणें जरूर असल्यास ते करणेंहि अटळ होय.

---

* टीपः—क्र. २ ला ( २ अ ) व ( २ ब ) असें विकल्प सुचविलें आहेत. पैकीं विकल्प ( २ अ ) अमलांत आणणें इष्ट पण आरंभीं तें शक्य न झाल्यास ( २ ब ) अमलांत आणणें अटळ.

† उपाय २ ( अ ) हा वैकल्पित ( optional ) म्हणुन सांगितलेला असला, तरी, ज्या गांवांत भूकबळी पडेल, तेथें तो विकल्प काढून घेऊन, २ ( अ ) ची सक्तीनें अंमलबजावणी करण्यांत यावी, व इतर उपायही अंमलांत आणावे, हे लेखांत पुढें सुचवेलेंच आहे.

**इंडस्ट्रियल फायनान्स कार्पोरेशनच्या कामकाजाची चौकशी**

इंडस्ट्रियल फायनान्स कार्पोरेशनच्या कामकाजाची चौकशी करून अहवाल सादर करण्यासाठी अर्थमंत्र्यांनीं लोकसभेंत १७ डिसेंबर १९५२ रोजीं दिलेल्या आश्वासनानुसार भारत सरकारनें लोकसभेच्या सदस्य श्रीमती सुचेता कृपलानी यांचे अध्यक्षतेखालीं एक समिति नेमली आहे. समितीनें अहवाल दोन महिन्यांत सादर करावयाचा आहे.

समितीच्या पुढील कामाचे विषय पुढीलप्रमाणें आहेतः—

(१) लोकसभेंत इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशन (दुरुस्ती) विधेयकाच्या चर्चेच्या वेळीं कॉर्पोरेशनवर वशिलेबाजीबाबत केलेले आरोप लक्षांत घेऊन तिच्या कर्जव्यवहाराची छाननी करणें.

(२) कर्जें मंजूर करतांना योग्य काळजी घेतली जाते किंवा कसें, याबाबत तपासणी करणें.

(३) कार्पोरेशननें सदरहु कायद्याचीं उद्दिष्टें आणि सरकारनें दिलेल्या सूचना यांची योग्य ती दखल घेऊन कर्जमंजुरीबाबत अवलंबिलेल्या धोरणाचें पुनर्विलोकन करणें, आणि,

(४) जरूर पडल्यास कार्पोरेशनच्या व्यवहारांत सुधारणा करण्यासाठी शिफारसी करणें.

---

**सहकारी सेक्रेटरी शिक्षण वर्गाच्या परिक्षेचा निकाल**

दक्षिण सातारा जिल्हा को-ऑ. बोर्डाच्या विद्यमानें कवठेमहंकाळ ता. मिरज येथें ता. ४-१०-१९५२ ते ११-१२-५२ अखेरीस झालेल्या सहकारी सेक्रेटरी शिक्षण वर्गाच्या परिक्षेचा निकाल खालीलप्रमाणें जाहीर करणेंत आला आहे. परिक्षेस एकूण २८ विद्यार्थी बसले होते. त्यांपैकीं पहिल्या वर्गांत (१) दुसऱ्या वर्गांत (३) तिसऱ्या वर्गांत (१४) असे एकूण १८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचें शेंकडा प्रमाण ६४३⁄७ आहे.

वर्ग १ ला (गुणानुक्रमें) खंडेराव तुकाराम थोरात.

वर्ग २ रा (गुणानुक्रमें) (१) व्यं. पां. भोसले (२) भु. दा. भक्ते (३) गो. द. कुलकर्णी.

वर्ग ३ रा (गुणानुक्रमें) (१) पां. सु. पाटील (२) आ. प. पाटील (३) वि. शा. भोसले, (४) ग. गो. जाधव, (५) ल. गो. कुलकर्णी, (६) चिं. रा. कुलकर्णी, (७) ग. पां. माने (८) ग. बा. कोळी, (९) ग. बा. पाटील, (१०) आ. कृ. वाडकर, (११) र. सि. पवार, (१२) भू. ता. पाटील, (१३) ज. आ. भोसले, (१४) पां. वि. पाटील.

---

**मद्रासला मुंबईबरोबर दर्जा द्या**—मद्रास शहर हें मुंबई आणि कलकत्ता ह्यांच्याच दर्जाचें मानण्यांत यावें, असा १७ बँक नोकर युनियन्सनीं ऑल इंडिया इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनलकडे अर्ज केला आहे. सेन अवार्डनें मद्रास शहरास 'ब' दर्जा दिला, तो गैरवाजवी असल्याचें अर्जांत म्हटलें आहे. गेल्या दहा वर्षांत मद्रासची लोकसंख्या दुप्पट होऊन १५ लाखांवर गेली आहे आणि तेथील रहाणीचा खर्च मुंबई अथवा कलकत्ता ह्यांपेक्षां कमी नाहीं, असेंहि नमूद करण्यांत आलें आहे.

**अन्नधान्याचें उत्पादन**—१९५१-५२ सालीं भारतांत ४·१२६ कोटी टन अन्नधान्याची निपज झाली. त्यापैकीं ८० लाख टनापेक्षा थोडें अधिक उत्पादन उत्तरप्रदेशांत झालें. त्याच्या खालोखाल मद्रासमध्यें सुमारें ६०॥ लाख टन अन्नधान्याचें उत्पादन झालें. १९४७ सालीं भारतांत ०·५ दशलक्ष किलोवॅट विजेचें उत्पादन झालें होतें. पंचवार्षिक कार्यक्रम पुरा झाल्यावर तें ५·५ दशलक्ष किलोवॅट होईल.


# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

—पुणें शहर—

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८३

भोर, पौड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतही सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जें देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

**चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.**

**अेक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीही स्वीकारल्या जातात.**

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

**दराबद्दल समक्ष चौकशी करावी.**

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याखेरीज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रवडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.



# बँक ऑफ पूना लि.

(शेडयूल्ड बँक)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें : | २५,००,००० |
| वसूल भांडवल : | १२,५०,००० |

**—संचालक मंडळ—**

१ श्री. मुरलीधर चतुर्भुज लोया, चेअरमन
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी.
३ डॉ. नारायण भिकाजी परुळेकर M. A. Ph. D. संपादक, सकाळ, पुणें.
४ श्री. फ्रामजी प्री. पोचा, बियांचे व्यापारी.
५ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी
६ श्री. गणपतराव काळूराम नाईक, B. SC., B. E., LL. B.

शाखा—(१) भवानी पेठ, पुणें. (२) सदाशिव पेठ, पुणें. (३) सोलापूर (४) सांगली.

व्याजाचे दर—चालू ठेव १/२ टक्का. सेव्हिंग्ज १॥ टक्का.

**मुदत ठेव : १ वर्ष ३ टक्के, ५ वर्षें ४ टक्के.**

एक वर्षापेक्षां कमी मुदतीच्या ठेवींवर आकर्षक व्याज.

मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत लॉकर्सची सोय.

मुख्य ऑफिस : ४५५ रविवार, पुणें २.

गो. गं. साठे,
मॅनेजर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.